परिपत्रक क्र.:प्र.अ/विनि/७७/२०१९-२०

# महाराष्ट्र शासन

क्र.टिपीएस-१८१८/१९८१/प्र.क्र.३०८/१८/नवि-१३
नगर विकास विभाग, मुख्य इमारत,
चौथा मजला, मंत्रालय, मुंबई-३२
दि.१८/०६/२०१९.

प्रति,

१) आयुक्त,
सर्व महानगरपालिका.

२) महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.

३) मुख्याधिकारी,
सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती.

**विषय :- सुविधा भुखंडाच्या विकासाबाबत.**

नियोजन प्राधिकरणांच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये ज्या ठिकाणी आरक्षणाचे क्षेत्र सुविधा क्षेत्रामध्ये समायोजित (adjustment) करण्याची तरतूद आहे अशा सुविधा क्षेत्राच्या तरतुदीबाबत खालीलप्रमाणे स्पष्टता करण्यात येत आहे.

नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्रामधील जमिनीचा विकास करतेवेळी जर सदर जमिनीवर मंजूर विकास योजनेतील आरक्षण असल्यास व आरक्षणाचे क्षेत्र सुविधा क्षेत्रापेक्षा कमी असल्यास सदरचे आरक्षण सुविधा भूखंडावर दर्शवून असा सुविधा भुखंड नियोजन प्राधिकरणांना विकास परवानगीच्या वेळीच हस्तांतरीत करणे जमिनधारकावर / विकसकावर बंधनकारक आहे. अशा ताब्यात येणाऱ्या भुखंडास समावेशक पध्दतीने आरक्षण विकसनाच्या तरतुदी लागू होणार नाहीत. मात्र, मंजूर विकास योजनेतील आरक्षणाचे क्षेत्र आवश्यक सुविधा क्षेत्र, भूखंडापेक्षा जास्त असल्यास त्या परिस्थितीत देखील सुविधा भूखंडाचे क्षेत्रावर आरक्षण दर्शविता येईल व अशा सुविधा भुखंडाचे क्षेत्र नियोजन प्राधिकरणास हस्तांतरीत झाल्यानंतर आरक्षणाचे उर्वरीत क्षेत्र खुल्या स्वरुपात अथवा समावेशक आरक्षणाच्या तरतूदीनुसार हस्तांतरीत करुन घेणे या बाबत उर्वरीत आरक्षणाचे क्षेत्र विचारात घेवुन संबंधित महानगरपालिका आयुक्त / महानगर आयुक्त / मुख्याधिकारी निर्णय घेवु शकतील. उर्वरीत आरक्षण समावेशक आरक्षणाच्या तरतूदीनुसार जमीन धारकाकडून विकसीत करुन घेते वेळी त्यालगतचे सुविधा भूखंडाचे संपुर्ण क्षेत्रावरील आरक्षण मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील जमीन धारकाकडून Construction TDR देण्याचे बदल्यात विकसीत करुन घेता येईल. तसेच अशा प्रकारे आरक्षण विकसित होत असताना आरक्षणाचा विकास सुसंगत पध्दतीने व्हावा, याची दक्षता आयुक्त / महानगर आयुक्त/ मुख्याधिकारी यांनी घेणे आवश्यक राहील.

( किशोर गोखले )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :-** १) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सहसंचालक, नगर रचना, पुणे / नागपूर / नाशिक / अमरावती / औरंगाबाद / कोकण.

mc

बृहन्मुंबई महानगरपालिका
आयुक्तांचे कार्यालय

19 JUN 2019

समय ११, १२, १३, १४
१५, १६, १७, १८

क्रमांक MGM 2508

बृहन्मुंबई महानगर पालिका
प्रमुख अभियंता (विकास नियोजन)
यांचे कार्यालय

| ११ | 21 JUN 2019 | ३ |
|---|---|---|
| १२ | | ४ |
| १ | | ५ |
| २ | | ६ |

क.प्र.अ./वि.नि./ 6589

| साधारण | शहर | पूर्व. उप | प. उप |
|---|---|---|---|
| | | लेखा | आस्था |

SP

Dy. Ch E (DP) I / II

21/06/19

Chief Engineer (DP)

Dy. Ch. Eng (DP) III / AO (DP) - III

To circulate & upload
on ch. E (DP) site
Dy. Ch. Eng (D.P.) I
23/6/19

मुख्यालिपिक (सांधा२०१)

उपरोक्त 'A' च्या अनुषंगाने
सदर परिपत्रक मनपा संकेत स्थळावर
प्रदर्शित करण्याची कार्यवाही करून पुढील
या विभागामध्ये (पुनर्विलोकित) परिपत्रक कार्यालय
वाटवावी. तसेच सर्वांना वितरित करावे.
25/06/19
प्रशासकिय अधिकारी (वि.नि.)III